# Good Work Of Nagpur Rural Police

## अनुसुचित जा. व ज. (अत्याचार प्रतिबंधक) कायदा  व नागरी हक्क संरक्षण अधि. तसेच अनु.जा.व ज. (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यासंबंधाने नागपूर परीक्षेत्रातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांची कार्यशाळा संपन्न

आज दिनांक २१/०९/२०१६ रोजी नागपूर (ग्रमिण) पोलीस मुख्यालय येथील ''दिवाण-ए-आम'' या सभागृहामध्ये सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक, श्री. रविंद्र कदम तसेच नागपूर (ग्रामिण) पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण अधिनियम - १९५५ तसेच अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंधक) २०१५ या कायद्या संबंधाने एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला नागपूर परिक्षेत्रातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना आमंत्रित करण्यात आले होते

अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा हा संवेदनशील आणि विशिष्ट कायदा आहे. या कायद्याचा तपास हा वस्तुनिष्ठ पद्धतीने कसा करावा? तसेच या कायद्यामध्ये सध्या दोषसिद्धीचे प्रमाण हे अत्यल्प असल्याने सदर कार्यशाळेमध्ये या कायद्यांतर्गत झालेल्या नविन सुधारणा तसेच तपासी अधिकारी यांना प्रत्यक्ष तपास करतांना येणाऱ्या अडीअडचणी याबाबत त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून या कायद्यांतर्गत दोषसिद्धी कशी वाढविता येईल? या उद्‌देशाने  सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे प्रमुख वक्ते म्हणुन अनुसूचित जाती व जमाती आयोगाचे सदस्य श्री. थुल यांनी यावेळी उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना अ.जा.ज. आयोगाच्या प्रमुख भूमिकेबाबत अवगत करून तपासी अधिकाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये APP & ADGP श्री. अजय निकोसे (सरकारी अभियोक्ता) यांनी या कायदयान्वये मा. न्यायालयात पुरावा ग्राहय न मानल्याने दोषमुक्त केल्याबाबतच्या गुहयांची कारणे सांगुन, असे गुन्हे घडल्यास तपासी अधिकाऱ्यांनी कोणत्या

आणि कशा प्रकारे तपास करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त श्री. वाकुडकर यांनी अ.जा. व ज.कायदा, ना.ह.स. या कायद्यासंदर्भात शासनाचे काय आदेश वा कार्यपद्धती आहेत. तसेच नविन कार्यपद्धती व कायद्यातील सुधारणांबाबत उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर नागरी हक्क संरक्षण, मुंबईचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. कैसर खालीद यांनी अ.जा.ज. प्र.कायदा, ना.ह.स. कायदा या संदर्भात झालेल्या नविन सुधारणा तसेच तपासी अधिकारी यांनी कायद्याचा पुर्ण अभ्यास करावा, सबळ पुरावा असेल तरच दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करावे असे यावेळी मार्गदर्शन करतांना सांगितले. नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक, श्री. रविंद्र कदम यांनीही आपल्या मार्गदर्शनात या कायद्यांतर्गत तपास करतांना तपासी अधिकारी यांनी कोणकोणती काळजी घ्यावी की जेणेकरुन मा. कोर्टात दोषारोपपत्र दाखल झाल्यावर आरोपीला शिक्षा होईल असे सांगितले. तसेच नागरी हक्क संरक्षण विभाग नागपूरच्या पोलीस अधिक्षक श्रीमती निर्मला देवी यांनीही दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याबाबत तपासी अधिकारी यांनी काय खबरदारी घ्यावी? याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक  भाषण अपर पोलीस अधिक्षक श्री. नरसिंग शेरखाने यांनी केले. या कार्यशाळेला तसेच नागपूर परिक्षेत्रातील ,नागपूर (ग्रमिण) सह वर्धा, भंडारा, चंद्रपूर या जिल्हयातील  उपविभागिय पोलीस अधिकारी  व इतर पदाधिकारी  प्रामुख्याने उपस्थित होते.


नागपूर परिक्षेत्र नागपूर
अनुसुचित जाती / जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ व ना. ह. स. कायदा १९५५
अनुसुचित जाती / जमाती (अत्याचार प्रतिबंधक) सुधारणा अधिनियम २०१५
कार्यशाळा
दिनांक : २१. ०९. २०१६
स्थळ :- दिवाण-ए-आम पोलीस मुख्यालय, टेका नाका, नागपूर ग्रामीण
विनीत : श्री. अनंत रोकडे (भा. पो. से)
पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) नागपूर

